# महाराष्ट्र शासन

क्र. संकिर्ण-०९१८/प्र.क्र. १०९/ १३-स
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दि. ०३ जुलै, २०१९

परिपत्रक :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७अ, कलम ७८ अन्वये ज्या सहकारी संस्थांवर प्राधिकृत अधिकारी / प्रशासक यांची नेमणूक केली जाते. अशा सहकारी संस्थांचे दैनंदिन कामकाज नियुक्त केलेले प्राधिकृत अधिकारी/ प्रशासक/ प्रशासक मंडळ पूर्ण करत असतात. या कामकाजामध्ये संस्थेचे दैनंदिन कामकाजासोबतच संचालक मंडळाच्या निवडणूकीची प्रक्रिया विहीत मुदतीत पूर्ण करणे व त्याअनुषंगिक करावयाच्या पूर्व तयारीच्या कामकाजाचाही समावेश होतो. परंतु निवडणूक प्रक्रिया विहीत मुदतीत पूर्ण करण्यासाठी करावयाच्या कामकाजाकडे प्राधिकृत अधिकारी / प्रशासक दुर्लक्ष करून, सदर कामकाजात ब-याच त्रुटीही ठेवत/ राहत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. त्याचा परिणाम म्हणून संस्थेची निवडणूक प्रक्रिया पूर्ण करताना संबंधित संस्थेचे निबंधकांना / निवडणूक निर्णय अधिका-यांना / निवडणूक प्राधिकरणास विविध अडचणी येतात. त्यासाठी सर्व निबंधकांना सूचित करण्यात येते की, आपल्या अधिनस्त नियुक्त केलेल्या संस्थावरील प्राधिकृत अधिकारी / प्रशासक यांना आपल्या स्तरावरून खालील सूचना देण्यात याव्यात :-

१) प्राधिकृत अधिकारी यांनी पदभार घेतल्यानंतर संबंधित संस्थेचा आदर्श उपविधी मंजूर आहे काय, याची खात्री करणे. आदर्श उपविधी मंजूर झालेला नसल्यास आदर्श उपविधी मंजूरीबाबत कार्यवाही प्राधान्याने पूर्ण करावी.

२) प्राधिकृत अधिकारी यांचेमार्फत विहित मुदतीत संचालक मंडळाचे निवडणूकीकरीता आवश्यक असणारी पात्र मतदाराची यादी तयार करून जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडे विनाविलंब सादर करण्यात यावी.

३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ व त्याखालील नियम १९६१, महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम तसेच संस्थेचे मंजूर आदर्श उपविधी यातील तरतुदींचे पालन करून निर्दोष मतदार यादी तयार करावी.

४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ (आय) चे उल्लंघन होणार नाही यांची दक्षता घेण्यात यावी.

५) मतदार यादीमध्ये थकबाकीदार सभासदांचा समावेश करणे, थकबाकीदार सभासदांना नियमानुसार थकबाकी भरण्याकरीता कायदेशीर नोटीस न देणे इ. मुळे मतदार यादीबाबत विवाद निर्माण होऊन निवडणूक मोकळ्या, भयमुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यात अडचणी निर्माण होतात. हे सर्व टाळण्यासाठी अशा प्रकारच्या अडचणी निर्माण होणार नाहीत याची पुरेपूर काळजी घेण्यात यावी.

६) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २७(1A) नुसार अक्रियाशील सभासदांना मतदानाचा अधिकार नसल्यामुळे मतदार यादीमध्ये अक्रियाशील सभासदाचा समावेश होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७) मतदार यादी तयार करताना संस्थेचे सभासद नोंदवही "आय" नमुना, सभासद यादी, "जे" नमुना, शेअर्स सर्टिफिकेट यांचा आधार घेवून मतदार यादी तयार करावी.

८) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१०) नुसार विहीत मुदतीत निवडणूक पूर्ण करण्याकरीता काळजीपूर्वक प्रयत्न करावेत.

सर्व निबंधकांना सुचित करण्यात येते की, संस्थेवर नियुक्त केलेले प्राधिकृत अधिकारी / प्रशासक हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये नमूद कालावधी पेक्षाही जास्त कालावधी करीता अनाकलनीय कारणांकरीता कार्यरत राहतात ही बाब अधिनियमातील तरतूदींशी विसंगत आहे कारण महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील विविध तरतूदींचे अवलोकन केले असता प्रशासक / प्राधिकृत अधिकारी यांना मुदतवाढ देण्याची तरतूद कायद्यात आढळून येत नाही त्यामुळे नियमाप्रमाणे विहीत मुदतीत निवडणूका घेण्याची कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०१९०७०३१६५५५८४१०२ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Chaudhary Anil Jayaram

Digitally signed by Chaudhary Anil Jayaram
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing and Textile, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f26cf80358fa3133e4d85ddac30ae54b06c63743fd5510dc0ebca082b6c483ce, cn=Chaudhary Anil Jayaram
Date: 2019.07.03 17:05:17 +05'30'

(अनिल ज. चौधरी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति-

१. सचिव, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे- यांना विनंती करण्यात येते सदर परिपत्रक सर्व विभागीय सहनिबंधक, जिल्हा उपनिबंधक, सहायक निबंधक, सहकारी संस्था यांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

प्रत,

१. प्रधान सचिव (सहकार) यांचे, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
२. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
३. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, साखर संकुल,शिवाजी नगर, पुणे
४. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे
५. संचालक, हातमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर
६. निवडनस्ती कार्यासन १३-स.